# ‘उमवि’तील विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षेची शपथ

**जळगाव, ता. २२ :** कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या संगणकशास्त्र प्रशाळा व क्विकहिल फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने ‘राष्ट्रीय सायबर सुरक्षा माह’ अंतर्गत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमात जळगाव सायबर पोलिस ठाण्याचे उपनिरीक्षक दिगंबर थोरात यांनी विविध प्रकारच्या ऑनलाइन सायबर धोके तसेच ते कशा पद्धतीने रोखता येतील याबाबत माहिती दिली. पोलिस नाईक सचिन सोनवणे यांनी फोटा मॉर्फिन, सायबर बुलयिंग, इत्यादीबद्दल माहिती देवून मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी दोन नाटिका सादर केल्या. कार्यक्रमात ‘सायबर फ्रॉड पासून सावध व्हा, सांगतोय आपला पोलिस बाप्पा’ या गाण्यावर पोस्टर्स प्रेझेंटेशन झाले व सायबर सुरक्षेची शपथ विद्यार्थ्यांना देण्यात आली. यावेळी संगणकशास्त्र प्रशाळेचे संचालक व व्य.प. सदस्य प्रा.एस.आर. कोल्हे, प्रा. राजीव आमले, प्रा. एस.व्ही. कापसे, प्रा. मनोज पाटील, प्रा. अजय सुरवाडे उपस्थित होते. सूत्रसंचालन गौरव चौधरी व गायत्री ठाकरे यांनी तर आभार आशिष पाटील यांनी मानले.